१६८

परिपत्रक    सांकेतांक क्र. 1986062622    क्रमांक एकत्री/ ... -३५
पुणे, दिनांक 26 JUN 1986

प्र. ३५८    १५५

विषय :- ग्राम एकत्रीकरण योजना
३१-३-८० पूर्वी कार्यान्वित झालेल्या एकत्रीकरणातील छापावयाच्या नकाशांबाबत.

संदर्भ :- इकडील परिपत्रक, क्रमांक ... दिनांक १८-१२-८५.

सोलापूर, नाशिक, जळगांव, धुळे, भंडारा, औरंगाबाद वगैरे काही जिल्ह्यातील वेगवेगळ्या तालुक्यातील गावांचे एकत्रीकरण योजनेचे काम पूर्ण होऊन बराच कालावधी झाला तरी काही गावांचे छापील नकाशे प्राप्त झालेले नाहीत/गावपातळीपर्यंत गेलेले नाहीत. अशा तक्रारी जमाबंदी आयुक्त यांचे कार्यालयाकडे येतात. ही परिस्थिती त्वरीत सुधारणे आवश्यक आहे. शासकीय फोटो मुद्रणालयाकडे सन १९८० पूर्वीचे कोणतेही नकाशे छपाईवर शिल्लक नाहीत असे त्यांचेकडून कळविण्यात आले आहे. दिनांक ३१-३-८० पूर्वी एकत्रीकरण योजना कार्यान्वित झालेल्या ज्या गांवचे ग्रामनकाशे अद्यापपर्यंत छपाई होऊन उपलब्ध झालेले नसतील त्या सर्व गावांचे नकाशे विशेष जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख [अनुरेखन] पुणे यांचेकडून पेपर ट्रेसिंग करून घेऊन मुद्रणालयात पाठवून अग्रक्रमाने छपाई करून घेणे जरूर आहे. त्याकरिता खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१] वरील कामासंबंधात सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांना जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख यांचेशी सहाय्य करून सर्व जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख यांनी अशा छपाई न झालेल्या दिनांक ३१-३-८० पूर्वीच्या एकत्रीकरण ग्राम नकाशांच्या गावांची यादी तयार करून अधीक्षक भूमि अभिलेख यांना ७ दिवसांत सादर करून त्याची एक प्रत या कार्यालयात सादर करावी.

२] उपलब्ध सर्व नकाशांच्या हस्तप्रती जास्तीत जास्त एक महिन्यात ट्रेसिंगसाठी विशेष जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख [अनुरेखन] पुणे यांना पाठवाव्यात. गावांचे एकत्रीकरणाचे हस्त नकाशे उपलब्ध आहेत ते प्रथम पाठवावेत. व एक महिन्याच्या मुदतीत सर्व गावांचे नकाशे विशेष जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख [अनुरेखन] पुणे यांना पाठविले जातील याची खात्री करून पूर्तता अहवाल ... अधीक्षक भूमि अभिलेख यांना सादर करून त्याची प्रत या कार्यालयात सादर करावी.

३] वरील कार्यवाही विहित मुदतीत न झाल्यास संबंधित जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख यांना वैयक्तिक जबाबदार धरण्यात येईल.

[कृपया मागे पहा]

S-249

तसेच जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख/सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांचेमध्ये योग्य सहकार्य घडवून आणण्याची जबाबदारी अधीक्षक भूमि अभिलेख/एकत्रीकरण अधिकारी यांची राहील.

विशेष जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख [अनुरेखन] पुणे यांनी गट नकाशाचे ट्रेसिंग छपाईसाठी मुद्रणालयाकडे पाठवितांना पत्राची एक प्रत संबंधीत जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख /सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांचेकडे पाठवावी. मुद्रणालयाकडून छापून आलेले नकाशे प्राप्त होताच जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख यांनी सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी व अनुरेखन कार्यालयास कळवावे. विशेष जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख [अनुरेखन] पुणे यांनी वरील ग्रामनकाशे अग्रक्रमाने तयार करुन ते छपाईसाठी त्वरीत पाठविण्याची कार्यवाही करावी. तसेच विशेष जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख [अनुरेखन] पुणे यांनी छपाईसाठी पाठविलेले नकाशे मुद्रणालयाकडून त्वरीत छपाई करुन प्राप्त करुन घेणेबाबत आवश्यक ती कार्यवाही संबंधीत जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख यांनी करणेची आहे. सर्व उपसंचालक यांनीही याकामी वैयक्तीक लक्ष पुरवून पूर्तता केली जाते यावर नियंत्रण ठेवावे.

स्थानापन्नवर जमाबंदी आयुक्त
पुणे यांची स्वाक्षरी असे.

सही/-
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख [म.रा.] पुणे यांचेकरिता.

सं/

प्रतिलिपी/- उपसंचालक भूमि अभिलेख [सर्व]/ अधीक्षक भूमि अभिलेख [सर्व]/ एकत्रीकरण अधिकारी [सर्व] सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी [सर्व ]/ जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख [सर्व] विशेष जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख [अनुरेखन] पुणे यांचेकडे माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रतिलिपी/- कार्यासन अधिकारी [सर्व] व अभिलेखापाल जमाबंदी आयुक्त पुणे यांचे कार्यालय यांचेकडे माहितीसाठी.